| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **HEALTH & FAMILY WELFARE TRAINING CENTRE, KOLHAPUR**<br>An ISO 9008:2015 Approved Institute | | | |
| | *Principal*<br>*Telephone No.(p)*<br>*Office Telephone No.* | *2693380*<br>*2693480* | Principal, Health & Family Welfare Training Centre Kolhapur<br>RK Nagar Road, Shenda Park, Kolhapur 416 012.<br>Email : hfwtc.kop1@gmail.com | NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA<br>NHM<br>राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र |
| Health Services, Govt. of Maharashtra<br>*https://arogya.maharashtra.gov.in* | | | No.HFWTC/NHM/VehicleQuotation/2686/2026<br>Dt. 27/02/2025 | |



# जाहिर सुचना

विषयः- भाडेतत्वावर वाहन पुरवठा दरपत्रक सादर करणेबाबत...

उपरोक्त विषयानुसार आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर या संस्थेतील प्रशिक्षक, प्रशिक्षणार्थी यांना क्षेत्रभेट, अधिनस्त कार्यालयांस भेटी देणेसाठी अधिकारी/कर्मचारी, विविध सर्व्हेक्षणे, प्रशिक्षण कार्यक्रम पाहणी/संनियंत्रण करीता तसेच वरीष्ठ कार्यालयातील अधिकारी पाहणी दौऱ्याकरीता कोल्हापूर, सांगली, सिंधुदूर्ग व रत्नागिरी या चार जिल्हयांमध्ये तसेच इतर परीमंडळांमध्ये जावे लागते. या कामकाजासाठी आवश्यकतेप्रमाणे ऑनकॉल भाडेतत्वार वाहन पुरविणेकरिता इच्छुक व पात्र पुरवठादारांकडून खालीलप्रमाणे सिलबंद दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रक मागवणेत येत आहेत.

**तांत्रीक कागदपत्रे:-**

**<u>मुख्य लखोटयामध्ये खालीलप्रमाणे साक्षांकीत कागदपत्रे क्रमवार सादर करणेची आहेत</u>:-**

१) सिलबंद व्यापारी लखोटा

२) संस्था नोंदणी प्रमाणपत्र **किंवा** शॉप ॲक्ट प्रमाणपत्र **किंवा** उद्यम आधार प्रमाणपत्र.

३) GST रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट.

४) GST रजिस्ट्रेशन लागू नसलेस चॅर्टर्ड अकौन्टट् यांचे लेटरहेडवर सही व शिक्क्या- निशी GST रजिस्ट्रेशन लागू नसलेचे सर्टीफिकेट. (टॅक्स कन्सल्टंट चे प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही)

५) आयकर नोंदणी प्रमाणपत्र (पॅन कार्ड).

६) प्रपत्र-अ प्रमाणे दरपत्रकाराचे हमी पत्र.

**व्यापारी लखोटा :-**

पुरवठादाराने खालीलप्रमाणे पुरवठादाराच्या लेटरहेडवर दरपत्रक तयार करुन सिलबंद व्यापारी लखोटा सादर करावा.

| Sr. No. | Vehicle Type | Particulars | Besic Rate | GST % | GST Amount | Rate with GST |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Swift Desire / ETIOS With AC | On Call basis Fix rate upto 120Km | | | | |
| | | On Call basis Extra Km (Rate Per K.M.) | | | | |
| 2 | Ertiga / Innova With AC | On Call basis Fix rate upto 120Km | | | | |
| | | On Call basis Extra Km (Rate Per K.M.) | | | | |
| 3 | Mini Bus (20 Seater) | On Call basis Fix rate upto 120Km | | | | |
| | | On Call basis Rate Per K.M. | | | | |
| 4 | 45 Seater Bus | On Call basis Rate Per K.M. | | | | |

*दरांच्या पत्रकामध्ये दिनांक नमुद करुन सही व शिक्का लावून एका लखोटयामध्ये घालून सदर लखोटा सिलबंद करावा.*

*नोटीसमध्ये नमुद केलेली सर्व कागदपत्रे साक्षांकीत करुन व वरील सिलबंद व्यापारी लखोटा दुसऱ्या लखोटयामध्ये घालायचा आहे व तो सिलबंद करायचा आहे (हा झाला मुख्य लखोटा).*

*मुख्य लखोटयावर "Quotation for Vehicle" असा उल्लेख करुन तो "Principal, Health & Family Welfare Training Centre, Kolhapur" यांचे नांवे सादर करायचा आहे व मुख्य लखोटयाच्या मागील बाजूस संस्थेचे नाव, पत्ता, संपर्कासाठी मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी नमुद करावा.*

खालील अटी व शर्तीस अधिन राहुन दरपत्रक सादर करावे.

१) मुख्य लिफाफयावर संस्थेचे नाव, पत्ता, संपर्कासाठी मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी लिहिलेला असावा.

२) प्रवासादरम्यान पुरविल्या जाणाऱ्या वाहनाचे रजिस्ट्रेशन बुक, रोड टॅक्स पावती, वाहनाचा अद्ययावत विमा, वाहन चालकाचे वाहन चालविण्याचा परवाना, वाहन टुरिस्ट (प्रवासी वाहतुक परवाना) अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र इ. सर्व कागदपत्रे आवश्यकतेनुरुप राज्यातील कायद्यानुसार कंत्राटदाराला पुरवावी लागतील.

३) सर्व भाडयाने घेण्यात येणारी पाच आसन क्षमतेची वाहने वातानुकुलीत असणे आवश्यक आहे.

४) खालील १ ते ५ मधील सर्व खर्च कंत्राटदाराने करावयाचा आहे हे गृहीत धरुन दर भरावेत.

   १) डिझेल, ऑईल व ल्युब्रींकटस इत्यादी.

   २) अल्प आणि मोठी दुरुस्ती / नियमित मेंटेनन्स / स्वच्छता इत्यादी सर्व दुरुस्त्यासह.

   ३) चालकाचा मासिक पगार, टी.ए./डी.ए., बोनस सहीत (वाहन २४ तास राहील्यावरही ओव्हर टाईम दिला जाणार नाही.) वाहन मालकाने स्वतः आदा करावयाचा आहे.

   ४) परमीटचा खर्च, टोल टॅक्स व पार्कींग चार्ज, एअर कंडिशन चार्जेस.

   ५) सर्व अधिभार, कर वेळोवेळी शासनाने लागू केलेले सर्व कर आणि लेव्ही कंत्राटदाराला अदा करावा लागेल.

५) कोल्हपूर व सांगली जिल्हयात फिरती असल्यास किमान १२० कि.मी. चे भाडे अदा केले जाईल व इतर जिल्हयांतील फिरती असल्यास किमान ३०० कि.मी. भाडे अदा केले जाईल .

६) GST अथवा इतर करामध्ये वाढ झाल्यास निश्चित केलेल्या दरामध्ये वाढ करण्याबाबतचा निर्णय या कार्यालयाकडे राहिल.

७) वाहनाची धाव ही कार्यालयापासून मोजण्यात येईल. गॅरेज किंवा दुरुस्तीची धाव ही करारामध्ये धरण्यात येणार नाही.

८) या कार्यालयाच्या वाहन वापर काळात वाहनांच्या सुटया भागांची, टायर, ल्युब्रीकंटस, डिझेल आदिंच्या किंमतीत वाढ झाल्यास कुठल्याही प्रकारे दर वाढविले जाणार नाहीत / तशी मागणी करता येणार नाही. याबाबत अंतिम निर्णय प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर यांचे राहतील.

९) ज्या कालावधीत वाहन उपलब्ध नसेल त्या कालावधीमध्ये दुसऱ्या वाहनाची व वाहन चालकाची पर्यायी व्यवस्था करणे बंधनकारक राहील. ती न केल्यास पर्यायी व्यवस्थेसाठी जो खर्च केला जाईल तो देयकांतून अथवा सुरक्षा अनामती मधुन वसुल करणेत येईल. कोणत्याही कारणामुळे वाहन उपलब्ध करुन न दिल्यास पहिला एक तास वगळता पुढील प्रत्येक तासासाठी किंवा तासाच्या भागासाठी रु.५०/- (रुपये पन्नास मात्र) इतकी देय रकमेतून वजा केली जाईल अथवा वसुली केली जाईल.

१०) वाहन धारकाने वाहन दिलेल्या कालावधीकरीता वापरण्यास सुस्थितीत असणे आवश्यक

आहे. वाहन सुस्थितीत न आढळल्यास ठेका रद्द करण्यात येईल.

११) कामावर असताना कोणतीही दुर्घटना झाल्यास अथवा ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यास दुखापत/मृत्यु झाल्यास सदरची नुकसान भरपाई/मोबदला देण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच सदर प्रकरणी न्यायप्रविष्ट बाबी अथवा वाद निर्माण झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील. या अनुषंगाने नियमानुसार योग्य ते इन्शुरन्स करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. याबाबत प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर कोणतीही जबाबदारी घेणार नाही.

१२) इंधन व वंगण दुरुस्ती व वाहनचालकाचा खर्च वाहन ठेकेदारास करावा लागेल.

१३) वाहनाची किरकोळ अथवा मोठया स्वरुपाची दुरुस्ती करणे ही वाहन ठेकेदाराची जबाबदारी राहील.

१४) पुरवठादाराने अटी व शर्तीचा भंग केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील. दरपत्रक मंजूर झालेल्या ठेकेदाराने अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास येताच पुर्व सुचनेशिवाय दरकरार रद्द करण्यात येईल आणि मंजूर पुरवठाधारकाचे नाव काळया यादित घालनेची कारवाई केली जाईल.

१५) प्रत्यक्ष लॉगबुकातील कि.मी. च्या आधारे दरपत्रकातील निश्चित दराने देयके तयार करुन ती प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर यांचेकडे प्रमाणितीकरता देणे आवश्यक राहिल. प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर यांनी लॉगबुक व देयके प्रमाणित केल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार देय्यक रक्कम मंजूर दराप्रमाणे PFMS द्वारे अदा करणेत येईल. तसेच प्रत्येक बिलातून नियमाप्रमाणे टी.डी.एस. ची रक्कम कपात करणेत येईल.

१६) वाहन भाडयाने घेण्याच्या अटी व शर्तीमध्ये पुर्णतः अथवा अंशतः बदल करणे तसेच काही तांत्रिक अडचणीमुळे दरपत्रक नाकारणे अथवा कोणतेही कारण न दाखवता दरपत्रक प्रक्रिया रद्द करणेचा अधिकार प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर यांनी राखून ठेवलेला आहे.

वरील अटी व शर्ती प्रमाणे उपरोक्त दर कार्यादेश मिळाल्यापासुन ३१/०३/२०२७ पर्यंत ग्राहय राहतील. सदर सिलबंद दरपत्रके प्राचार्य, आरोग्य व कंटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर यांचे नावाने दिनांक ०९/०३/२०२६ पर्यंत कार्यालयिन वेळेमध्ये या कार्यालयास सादर करावीत. त्यानंतर प्राप्त झालेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

स्वा/-
(डॉ.वाय.आर.साळे)
प्राचार्य,
आरोग्य व कुटुंब कल्याण
प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर.

## दरपत्रकधारकांनी तांत्रीक कागदपत्रांमध्ये द्यावयाच्या हमीपत्राचा नमुना

### प्रपत्र-अ

मी/आम्ही/आमची संस्था या पत्रान्वये हमी देतो की, आमचा खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंध/संघर्ष नाही. तसेच मी/आम्ही/आमची संस्था सदर कामासाठी फक्त एकच दरपत्रक सादर केलेले आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या अन्य संस्थांमध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही. सदर जाहिर सुचनेमधील सर्व अटी व शर्ती आम्हाला मान्य आहेत.

दरपत्रकाराची सही व संस्थेचा
शिक्का